# महापालिकेच्या शाळेतील मध्यान्ह भोजनात सापडली काच

## निकृष्ट खिचडीबाबत एफडीएकडे तक्रार

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**मुंबई :** घाटकोपर पूर्व येथील मुंबई महापालिकेच्या पंतनगर शाळा क्र. ३ मध्ये मध्यान्ह भोजनात काच आढळल्याने पालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याची माहिती मिळताच शुक्रवारी मुंबई मनपामधील विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर शाळेत पोहोचल्या. या प्रकरणाबाबत त्यांनी येथील संबंधित अधिकाऱ्यांची झाडझडती घेतली. येथील खिचडी खाऊन पाहीली आणि तिचा दर्जा पाहून थेट अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांना कॉल लावत तक्रार केली.

३० जुलै रोजी या शाळेत आलेल्या मध्यान्ह भोजन जे श्रुती महिला बचत गट गृह उद्योग संस्था यांच्या माध्यमातून येते त्याच्या खिचडीमध्ये सहावीच्या विद्यार्थ्याला काच लागली. त्याने याची माहिती शिक्षक विकास घुगे यांना दिली. विकास घुगे यांनी वरिष्ठांना याची माहिती दिली असता त्यांना धमकावल्याचा आरोप घुगे यांनी केला. विकास घुगे यांनी त्या काचेचे फोटो काढले व याची माहिती विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांना दिली. त्या नगरसेवक साईनाथ दुर्गे, विधानसभा समन्वयक इम्रान शेख, प्रकाश वाणी व इतर पदाधिकाऱ्यांसह या शाळेत झाडझाडती घेण्यास पोहोचल्या. त्या आल्या तेव्हा येथे ठेवलेल्या मध्यान्ह भोजनाजवळ त्यांना कोणीही आढळले नाही. तसेच त्यांनी खिचडी खाऊन पाहिली असता यातील सोयाबीन चॉप्स कच्चे असल्याचे आणि तांदूळही बरोबर नसल्याचे आढळले

याबाबत त्यांनी संताप व्यक्त करत थेट अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनाच फोन करून या प्रकरणाच्या चौकशीसाठी तक्रार केली. तसेच येथील अधिकारी आणि कर्मचारी यांना फैलावर घेतले. याप्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी करत शाळेतील मध्यान्ह भोजन कंत्राट विश्वासू संस्थांना द्यावे, अशी मागणी केली. आमच्या भोजनात काच सापडणे आमच्यासाठी ही धक्कादायक आहे, हे कसे झाले याचा आम्ही ही शोध घेत आहोत. महापालिका प्रशासनही त्याची चौकशी करत आहे. आम्ही आता आणखी काळजी घेऊ, अशी प्रतिक्रिया श्रुती महिला बचत गट गृह उद्योगचे शैलेश तळेकर यांनी दिली.

# रक्तपेढ्यांना आता FDAचा चाप! राज्य रक्तधोरणात सामान्यांना तक्रारीचा अधिकार

प्रतिनिधी १ ऑगस्ट




**मुंबई :** रक्त किंवा रक्तघटक घेण्यासाठी डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन आवश्यक असेल. सरकारच्या दरानुसारच रक्त उपलब्ध करून द्यावे लागेल. दुर्धर रक्तविकार रुग्णांना निकषांनुसार विनाशुल्क रक्त देणेही बंधनकारक असेल.

जे. जे. महानगर रक्तपेढीसह राज्यातील विविध रक्तपेढ्या आणि रक्तसंकलन केंद्रांतील गैरप्रकारांचा 'महाराष्ट्र टाइम्स'ने सातत्याने पर्दाफाश केल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) या प्रकारांची गंभीर दखल घेतली आहे. राज्यातील सर्व रक्तपेढ्यांसाठी नव्या रक्तधोरणांतर्गत कडक निर्देश लागू करण्यात येणार असून, रक्तदान शिबिर आयोजकांसाठीही स्वतंत्र निकष निश्चित करण्यात आले आहेत. योग्य कारणांशिवाय रक्त उपलब्ध करून न देणे, विनाकारण रक्त नाकारणे, रक्तपेढ्यांमध्ये गैरप्रकार आढळणे किंवा रुग्णांची आर्थिक पिळवणूक होणे, अशा घटनांबाबत आता सर्वसामान्य नागरिकांना थेट 'एफडीए'कडे तक्रार करता येणार आहे. तक्रारींची दखल घेऊन संबंधित रक्तपेढ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यापासून परवाना रद्द करण्यापर्यंतची पावले उचलली जाणार आहेत.

नव्या धोरणानुसार रक्तदान शिबिरात किती युनिट रक्त संकलित झाले, त्यावर पुढील प्रक्रिया कशी झाली, रक्ताचे वितरण कुठे झाले आणि त्याचा वापर कसा झाला, याची संपूर्ण माहिती राज्य रक्त संक्रमण परिषदेसह 'एफडीए'लाही देणे बंधनकारक असेल. त्यामुळे रक्तसंकलनापासून रक्तवितरणापर्यंतची संपूर्ण साखळी तपासणीच्या कक्षेत येणार आहे. यापुढे रक्तदान शिबिरांचे आयोजन कुठेही, कोणत्याही पद्धतीने करता येणार नाही. आयोजकांना बंदिस्त, सुरक्षित आणि स्वच्छ जागा, तसेच वैद्यकीय सुविधा, औषधोपचार, रुग्णवाहिका, रक्त संक्रमण अधिकारी, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि डॉक्टरांच्या उपस्थितीतच शिबिर घ्यावे लागेल.

# मदतीचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**मुंबई :** डोंबिवलीतून अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. घरात वाद झाला म्हणून रागा बाहेर पडलेल्या एका अल्पवयीन मुलीसोबत भयंकर प्रकार घडला आहे. अल्पवयीन मुलगी एका हॉटेलवर जेवायला गेली. त्यावेळी या नराधम हॉटेलचालकासह २ अल्पवयीन मुलगी एकटी असल्याचं पाहून तिला निर्जनस्थळी नेऊन सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात तिघांना डोंबिवली मानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डोंबिवली पूर्वेतील मानपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरातून बेपत्ता झाली होती. भाऊजाई सोबत वाद झाल्याने एका व्यक्तीसोबत ती घरातून निघून गेली, बदलापूर कटाई रस्त्यावर एका हॉटेलला जेवण घेण्यासाठी गेली होती. पण त्यावेळी या अल्पवयीन मुलीकडे पैसे नसल्याने हॉटेल चालकांनी तिला काही खायला दिलं. हॉटेल चालक अंगूर ठाकूर याने अल्पवयीन मुलीच्या मदत करण्याच्या नावाखाली तिच्या विश्वास संपादन केला. त्यानंतर अंगूर ठाकूर या विकृताने या परिसरात राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना बोलावलं आणि या मुलीची ओळख करून दिली. अल्पवयीन मुलीने या तिघांना आपली व्यथा सांगितली. ती तिच्या नातेवाईकांच्या घरातून निघून आली आहे. या तिघांनी तिला कामावर लावून देतो आणि राहायला घर पण देतो, असे सांगून एका निर्जन ठिकाणी नेऊन सामूहिक अत्याचार दुष्कर्म केला. पीडिता कुळगाव-बदलापूर परिसरात आढळून आल्यानंतर पोलिसांनी तिची सुटका केली. चौकशीत प्रकार उघड झाल्यानंतर मानपाडा पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्य आरोपी अंगूर ठाकूर (२२) याला अटक केली.

# डोंबिवलीत बांधकाम घोटाळा: केडीएमसीचा आणखी एक कारनामा; अनधिकृत बांधकामावर कारवाई ऐवजी दुर्लक्ष?

## 14 मजल्यांच्या परवानगीवर उभारली 21 मजली इमारत!

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अधिकारी आणि बिल्डरांचे संशयास्पद हस्तक पुन्हा एकदा समोर आले आहेत. महानगरपालिकेकडून केवळ १४ मजल्यांच्या बांधकामाची परवानगी घेऊन बिल्डरने २१ मजली इमारत बांधली आहे, हे धक्कादायक आहे. सत्ताधारी शिवसेनेने नगरसेवक शिंदे गट्ट्या घोटाळा किंवा महाघोटाळा उघडकीस आणून केडीएमसी प्रशासनात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

हा संपूर्ण अनधिकृत बांधकामाचा प्रकार डोंबिवलीच्या पश्चिमेकडील राजूनगर परिसरात सुरू झाला. संतोष भोईर आणि इतरांच्या हे मालक किंवा 'जागेवर नीता वैती' म्हणजेच बिल्डर म्हणून काम करत आहेत. महानगरपालिकेने इमारतीसाठी केवळ १४ मजल्यांनाच अधिकृत मंजुरी दिली असती. मात्र, बिल्डरने सर्व नियम आणि कायदे मोडून 'बसवून वरचे'चे ७ मजले पूर्णपणे अनधिकृतपणे बांधले.



शिवसेनेने शिंदे गट्ट्या स्थानिक नगरसेवक विकास म्हात्रे यांची उघड अकार्यक्षमता उघड केली आहे. संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती गोळा केल्यानंतर, त्यांनी थेट केडीएमसी आयुक्तांची भेट घेतली. अधिकृत परवांग्य धाब्यावर बसवून यांनी नागरिकांच्या हितासाठी लढणाऱ्या संबंधित बिल्डर्स, आर्किटेक्ट्स आणि जबाबदार पालिका अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ६५ अनधिकृत इमारतींनंतर आणखी एक नवीन प्रकरण

कल्याण-डोंबिवलीतमध्ये आधीच ६५ अनधिकृत इमारतींची प्रकरणे आहेत, तर आता चांगलेच तापळे येथील २१ मजली इमारतीचे नवीन प्रकरण समोर आले असून, पालिका प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहे. बिल्डर्स आणि महानगरपालिकेच्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने शहरात अनधिकृत बांधकामांसाठी मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे नागरिक आरोप करत आहेत की ही सामान्य घर खरेदीदार आणि सरकारची मोठी फसवणूक आहे.

केडीएमसीचे शहर आर्किटेक्ट संतोष डोईफोडे यांनी या संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, संबंधित महानगरपालिकेने आधीच कारवाई सुरू केली असून इमारतीचे ७ मजले पूर्णपणे अनधिकृत घोषित केले आहेत. एमआरटीपी कायद्यांतर्गत दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, हे देखील प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# स्टेशन मास्तरांवर श्वानांचीही जबाबदारी! सर्वोच्च न्यायालय



प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मुंबई :** रेल्वेस्थानक परिसरावर नियमित नजर ठेवणे, श्वानांचा प्रवेश रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि नियमित पाहणीची नोंद ठेवणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

रेल्वे स्थानकांवरील प्रवाशांची ये-जा, गाड्यांची धावपळ आणि फलाटांवरील लगबग ही नेहमीचीच. मात्र, याच गर्दीत गेल्या काही काळापासून भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने प्रवाशांच्या त्रासात भर पडली आहे. कुत्र्यांचा कधी फलाटावर फेरफटका, कधी प्रतीक्षालयात, तिकीट खिडक्यांसमोर ठाण, तर कधी खाद्यपदार्थांच्या शोधात प्रवाशांच्या मागे लागणे, अशा प्रकारांमुळे सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर आता भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाला आळा घालण्याची जबाबदारी स्टेशन मास्तरांकडे सोपवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाने प्रत्येक स्थानकासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाने ३० जुलै रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, सर्व स्थानक अधीक्षक आणि स्टेशन मास्तर (प्रभारी) यांची भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाला प्रतिबंध करण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानक परिसरात भटका कुत्रा आढळल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांवर निश्चित होणार आहे.

भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिकेत दिलेले निर्देश आणि रेल्वे मंडळाच्या सूचनांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे स्थानकांवर भटक्या कुत्र्यांची तक्रार केल्यास 'आम्ही काय करणार,' असे म्हणून रेल्वे अधिकाऱ्यांना हात वर करता येणार नाहीत. डॉग ड्युटी अंतर्गत नोडल अधिकाऱ्यांना स्थानक परिसर भटक्या कुत्र्यांपासून मुक्त ठेवावा लागणार आहे. यासाठी संबंधित महापालिका किंवा स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून भटक्या श्वानांचे व्यवस्थापन आणि आवश्यक कार्यवाही करावी लागणार आहे.

# चकाकीच्या मागे लपलेला कचऱ्याचा डोंगर

**मुंबई :** मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणून गौरवण्यात येत असले, तरी आजही या शहराची ओळख 'अस्वच्छता' या एका मोठ्या समस्येशी जोडलेली आहे. टोलेजंग इमारती, रोषणाई आणि कॉर्पोरेट जगताच्या चकाकीमागे मुंबईतील गल्लोगल्ली साचलेले कचऱ्याचे साम्राज्य आणि तुंबलेल्या गटारांचे वास्तव लपून राहत नाही.

दररोज हजारो टन कचरा निर्माण होणाऱ्या या महापालिकेत घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. रस्ते, फूटपाथ, आणि रेल्वे रुळांच्या दुतर्फा पडलेला कचरा, उघडी गटारे आणि प्लास्टिकच्या पिशव्यांचा अनियंत्रित वापर यामुळे शहराच्या सौंदर्याला तर गालबोट लागतच आहे, पण त्याचसोबत नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. पावसाळ्यात कचऱ्यामुळे नाले तुंबून पूरस्थिती निर्माण होणे ही तर मुंबईकरांसाठी दरवर्षीची डोकेदुखी ठरली आहे.महापालिकेकडून 'स्वच्छ भारत अभियाना'अंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो, विविध उपक्रम राबवले जातात.

# "मी तुमच्या उत्साहामुळे विसरायला लागलो. मला खरंच सुचत नाही, असं म्हणून अमित ठाकरे मंचावरुन खाली उतरले

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या २० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मनविसे अध्यक्ष अमित राज ठाकरे यांनी कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना संबोधित केलं. भाषण करताना अमित ठाकरे काही काळ अडखळले, तुमच्या उत्साहामुळे मी विसरलो, असं म्हणत ते मंचावरुन उतरुन खाली गेले आणि पाच मिनिटांनी पुन्हा व्यासपीठावर येऊन भाषण करु लागले.



सुरुवातीला भाषणाला उभं राहताना अमित ठाकरे म्हणाले, "थोड्या घोषणा द्या म्हणजे मला भाषण आठवेल. ज्या विद्यार्थी, तरुणांनी रस्त्यावर उतरत आंदोलन करुन, केंद्रातून राजीनामा आणला, त्यांचं आणि पालकांचं अभिनंदन. मी राज ठाकरेंचा मुलगा नसतो, तर राजकारणात आलो नसतो. ते माझे वडील आहेत म्हणून बोलत नाही, तर प्रामाणिक माणूस आहे म्हणून सांगतो. तुमच्यासारखे सहकारी नसते तर मी राजकारणात टिकलो नसतो. आपण आतापर्यंतची आंदोलनं विसरलो पाहिजे, पुढे जायला पाहिजे" असं सांगतानाच "मी तुमच्या उत्साहामुळे विसरायला लागलो आहे. मला खरंच सुचत नाहीये, मी परत येतो थांबा" म्हणून अमित ठाकरे मंचावरुन खाली उतरले

"मी खरंच काही पाठ करुन आलो नाही. तुमच्या ताकदीने धडकी भरली. आधीचं आठवतंय ना की परत बोलू? आपण विद्यार्थ्यांना व्हॅनमधून बाहेर काढत होतो. हा कॉन्फिडन्स माझ्यात कुठून आला? तर तुमची ताकद आणि राज ठाकरे नावाची शक्ती माझ्या मागे आहे. त्यावेळी पोलीस शांत होते. घाबरले होते का? तर नाही! महाराष्ट्र पोलीस आहेत ते. त्यांना आदरयुक्त दरारा होता. त्यांना माहिती की त्यांच्यासाठी कोणी उभं राहत असेल तर राज ठाकरे आणि महाराष्ट्र सैनिक. आपली ताकद समजून घेतली पाहिजे." असं अमित ठाकरे म्हणाले.

चंद्रकांत पाटलांवर टीका

"मी राजकारणी नाही, मला बोलता येत नाही. आपल्या राज्यात, देशात काय चालू आहे हे मला माहिती आहे. गेल्या एक वर्षात भीषण परिस्थिती पाहिली. खिळे लावून काठ्या घालतात, मुलींवर हात टाकतात, कपडे फाडतात. ते चंद्रकांत दादा पाटील काय बोलले...

दिल्ली पोलिसांनी दगड उचललेत, त्यावरील फिंगर प्रिंट आधारशी लिंक करणार. या मुलांनी केंद्रातून राजीनामा आणला, राज्यातून आणायला वेळ नाही लागणार. मला मारा-मला मारा म्हणणारा तो मुलगा नागपूरचा आहे. फडणवीसांच्या शहरातला. पण मुख्यमंत्र्यांना त्याच्यावर बोलावंसं वाटलं नाही" असंही अमित ठाकरे म्हणाले.

# महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय: अखबार बंद, डिजिटल बुलेटिन सुरु

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**मुंबई :** महाराष्ट्राच्या फडणवीस सरकारने छापील वृत्तपत्रांच्या वितरणावर बंदी घालण्याचा आदेश जारी करून एक मोठा निर्णय घेतला आहे. इतकेच नाही, तर १ सप्टेंबरपासून सर्व मंत्री आता ई-पेपर वाचतील. महाराष्ट्र सरकारने १ सप्टेंबरपासून उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांच्या कार्यालयांना आणि शासकीय निवासस्थानांना छापील वृत्तपत्रे आणि मासिकांचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाने एक शासकीय आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात आणि शासकीय निवासस्थानांना छापील वृत्तपत्रांचा पुरवठा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील. या वृत्तपत्रे आणि मासिकांचा खर्च सामान्य प्रशासन विभाग उचलेल. तथापि, इतर मंत्र्यांना वृत्तपत्रे आणि मासिकांचा खर्च त्यांच्या संबंधित विभागांकडून उचलावा लागेल. त्यांना आता वृत्तपत्रे आणि मासिकांसाठी ऑनलाइन वर्गणी घ्यावी लागेल. सामान्य प्रशासन विभागाने उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांमध्ये आणि शासकीय निवासस्थानांमध्ये ऑनलाइन वर्गणीद्वारे वृत्तपत्रे आणि मासिके उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या उद्देशासाठीची बिले उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांमार्फत संबंधित प्रशासकीय विभागांकडे सादर केली जातील.

शासकीय आदेशात म्हटले आहे की, या व्यवस्थेमध्ये होणारा खर्च संबंधित प्रशासकीय विभाग त्यांच्या उपलब्ध कार्यालयीन खर्चाच्या शीर्षकाखाली वाटप केलेल्या निधीतून उचलतील. आदेशात म्हटले आहे की, विभागाकडून उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांना व घरांना होणारा वृत्तपत्रे आणि मासिकांचा पुरवठा १ सप्टेंबर २०२६ पासून बंद केला जाईल. आदेशात असेही म्हटले आहे की, मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी आणि कार्यालयात वृत्तपत्रे व मासिके पोहोचवण्याची सध्याची पद्धत सुरू ठेवावी.

या कामावर होणाऱ्या खर्चाला या विभागाकडून मंजुरी दिली जाईल. वृत्तपत्रांची ऑनलाइन वर्गणी घेऊन उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांना व घरांना वृत्तपत्रे आणि मासिके उपलब्ध करून द्यावीत. शिवाय, यासाठीचे शुल्क उपमुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या कार्यालयांमार्फत संबंधित प्रशासकीय विभागाकडे जमा करावे.

# मुंबई हादरली! बायकोशी बदला घेण्यासाठी पित्याने स्वतःच्या मुलाचा घेतला जीव

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मुंबई :** मुंबईच्या गोराई परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि दुःखद घटना उघडकीस आली आहे. पत्नीच्या चारित्र्याबद्दलच्या संशयामुळे आणि घरच्या सततच्या आश्वासनांमुळे एका क्रूर बापाने आपल्या १० वर्षांच्या मुलाला, समुद्राला, धक्कादायक पद्धतीने जन्म दिला आहे.

या घटनेप्रकरणी गोराई पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गुरुवारी आरोपी बापांना अटक केली. या घटनेत अडकलेल्या आरोपीचे वडील बंटी राव (४०) आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,



आरोपी बंटी राव हा पत्नी आणि १० वर्षांचा मुलगा, १८ वर्षीय मुल्ली, यांच्यासह मालाडच्या मालवणी परिसरात राहत होता आणि गोराई बीचवर येणाऱ्या पर्यटकांचे फोटो काढण्याचे काम करत असे. गेल्या काही दिवसांपासून आरोपी बंटी राव याला आपल्या पत्नीच्या चारित्र्याबद्दल संशय होता. या संशयी पती-पत्नीमध्ये दररोज जोरदार भांडणे होत असत.

बुधवारीच, दिवस उजाडला होता आणि सकाळी ९ वाजता गोराई बीचवरील स्थानिकांना समुद्राच्या पाण्यात एक लहान मृतदेह तरंगताना आढळला. स्थानिकांनी तात्काळ गोराई पोलीस संगीतला यांना फोन केला. घटनेचे गांभीर्य लक्षात येताच, पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले, मृतदेह ताब्यात घेतला आणि चिमुकल्याची ओळख पटवण्याचे काम सुरू केले. धक्कादायक बाब म्हणजे, पोलिसांच्या तपासादरम्यान, समुद्राच्या पाण्यात १० वर्षे जुना मृतदेह तरंगताना आढळला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135